कोल्हापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

जिल्हा न्यायालय आवार, रुम नं. १६ व १७, २ रा मजला, क।। बावडा,
कोल्हापूर ४१६ ००६. दुरध्वनी क्रमांक : (०२३१) २५४१२९५.
ई-मेल : dlsa.dc.klp@gmail.com

मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, कोल्हापूर हे या प्राधिकरणांचे अध्यक्ष असून मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर, मा. पोलीस अधिक्षक, कोल्हापूर, मा. जिल्हा सरकारी वकील, कोल्हापूर, सचिव व अन्य सहा समाजसेवक / कायदेतज्ज्ञ हे प्राधिकरणांचे सदस्य आहेत.

कोल्हापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण / तालुका विधी सेवा समितीद्वारे खालील कार्ये केली जातात.

१) न्यायालय/न्यायाधिकरण/प्राधिकरण समक्ष कोणतेही प्रकरण किंवा इतर कायदेशीर कार्यवाही चालविण्याच्या प्रक्रियेत प्राधिकरणाच्या पॅनलवरील वकिलांमार्फत समाजातील दुर्बल घटकांना **मोफत विधी सल्ला व सेवा पुरविणे** व त्याकरिता ठिकठिकाणी **विधी सेवा व सल्ला केंद्रांची स्थापना करणे.**

२) कोल्हापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण/तालुका विधी सेवा समिती खालील व्यक्तींना मोफत विधी सेवा पुरविते –
१) स्त्रिया. २) बालके. ३) अनुसूचित जाती किंवा जमातीतील व्यक्ती. ४) अवैध मानवी व्यापारातील बळी किंवा भिकारी. ५) अपंग व्यक्ती, अंधत्व, कुष्ठरोग व तत्सम आजारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्ती. ६) सार्वत्रिक आपत्ती, जातीय हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर दुष्काळ, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी. ७) औद्योगिक कामगार. ८) अन्विक्षाधीन, न्यायालयीन कोठडीत असलेल्या व्यक्ती ज्यांमध्ये सुरक्षागृहातील किशोरवयीन अपराधी, म्हणजेच १८ वर्षेपर्यंत वय असलेल्या व्यक्तींचा किंवा मनोरुग्णालयातील अथवा शुश्रुषालयातील मानसिक रुग्ण यांचा समावेश आहे. ९) वार्षिक उत्पन्न रुपये ३ लाख पेक्षा कमी असलेल्या व्यक्ती.

३) खर्च व वेळेची बचत करून तसेच तांत्रिक बाबींचा अडसर टाळून जलदगतीने न्याय मिळवून देण्याच्या हमी करिता प्रलंबित प्रकरणांमध्ये दोन्ही पक्षांमध्ये समझोता घडवून समाधानकारक व अंतिम तोडगा काढण्याकरिता कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये वेळोवेळी **लोक-अदालतींचे आयोजन करणे.**

४) न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यानंतर होणारा विलंब, आर्थिक भूर्दंड, मानसिक व शारीरिक त्रास वाचविण्याकरिता **प्रकरण न्यायालयात / पोलीस स्टेशनमध्ये दाखल होण्यापूर्वीच समझोत्याने मोफत मिटविण्याकरिता मध्यस्थी केंद्राची स्थापना. मध्यस्थीमुळे बहुमुल्य वेळ, पैसा व श्रमाची बचत होते आणि नाते टिकते.**

५) वैवाहिक व अन्य प्रकारचे वाद **मध्यस्थी आणि समेट** पध्दतीने मिटविणे. यामुळे पैसा, कष्ट आणि वेळ यांची बचत होते व नाते टिकते.

६) कब्जे वादातील पक्षकार आणि सर्व सामान्य जनतेला विविध कायद्यांची माहिती देऊन विधी साक्षरता निर्माण करण्यासाठी ठिकठिकाणी **विधी साक्षरता शिबीरे** व अन्य निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन करणे.

७) **कैद्यांना आणि न्यायधिन बंदींना** मोफत विधी सेवा प्रदान करणे.

८) कोणत्याही न्यायालयात प्रलंबित नसलेल्या दाखलापूर्व खटल्यामध्ये तडजोड केल्याने वेळ, पैसा व श्रमाची बचत होते आणि नाते टिकते. (win-win situation) यासाठी मध्यस्थी केंद्र, कोल्हापूर येथे संपर्क साधा.

९) **महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी, बंदी बांधव, वारांगणा, स्त्री भ्रूण हत्या, सायबर क्राइम, अपंग, मतीमंद व्यक्ती** या विविध विषयांवर वेगवेगळे उपक्रम राबविणे.

१०) **''न्याय आपल्या दारी''** या योजनेअंतर्गत **फिरते लोक न्यायालय** सारखे उपक्रम राबविणे.

११) विधी स्वयंसेवक (PLV) विधी सेवा प्राधिकरणचे विधीस यांचे मदतीने गरजू व वंचित घटकांना मोफत कायदेशीर सल्ला व साहाय्य करणे.

१२) तुरुंगामधील बंदिबांधवांसाठी मोफत कायदेशीर सल्ला व साहाय्य करणेसाठी विधी सेवा व सल्ला केंद्राची स्थापना करणे.

मोफत विधी सेवा व सल्ला मिळविण्याकरिता तसेच अधिक माहिती व संपर्कासाठी पत्ते

कोल्हापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय आवार, रुम नं. १६ व १७, २ रा मजला, क।। बावडा, कोल्हापूर. दूरध्वनी : (०२३१) २५४१२९५ / २६६००६६

तालुका विधी सेवा समिती (तालुका न्यायालये) संपर्क क्रमांक

- आजरा – ०२३२३-२४६०३७
- चंदगड – ०२३२०-२२४४३५,
- गडहिंग्लज – ०२३२७-२२३८०३,
- इचलकरंजी – ०२३०-२४२१४००
- जयसिंगूपर – ०२३२२-२२९०४४
- कुरुंदवाड – ०२३२२-२४४५०१,
- कागल – २३२५-२४४१८०
- पेठवडगांव – ०२३०-२४७१२६०
- पन्हाळा– ०२३२८-२३५३१२
- शाहूवाडी-मलकापूर– ०२३२९-२२४००४
- राधानगरी – २३२१-२३४१६४
- गारगोटी– ०२३२४-२२०३७४
- गगनबावडा – ०२३१-२६६७०२२
- कळे, खेरीवडे – ०२३२८-२३२९६६

सुवर्ण/८२३७०३३७३८